# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **"आंतरराष्ट्रीय योग" दिनानिमित्त बुद्धविहार, विपश्यना केंद्रात मा. आयुक्त यांच्या मार्गदर्शन व उपस्थितीत योग शिबीराचे आयोजन**

दिनांक २१ जून २०२४ रोजी "आंतरराष्ट्रीय योग" दिनानिमित्त मिरा रोड पूर्व, आरक्षण क्रमांक २३०, बुद्धविहार, विपश्यना केंद्र येथे आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत महिला व बालकल्याण विभागामार्फत सकाळी ठीक ८:०० वाजता योग शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर योग शिबिरास अति. आयुक्त संभाजी पानपट्टे, उपायुक्त (मुख्यालय) रवि पवार, उपायुक्त (महिला व बालकल्याण) कल्पिता पिंपळे, शहर अभियंता दिपक खांबित, महापालिका विभागप्रमुख, स्थानिक नागरिक व कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम योग शिबीर सुरू करण्यापूर्वी योग शिक्षिका प्रतिमा वाघ यांनी आरोग्याविषयी उपस्थित अधिकारी/कर्मचारी यांच्याशी महत्त्वपूर्ण असा संवाद साधला. तसेच योगा शिक्षिका यांनी योगाचे प्रकार, योगा केल्याने शरीरास होणारे फायदे, योगा करण्याची सर्वोत्तम पद्धत याबाबत माहिती दिली. आपल्या नेहमीच्या धकाधकीच्या आयुष्यात दररोज किमान एक तास योगा केल्याने आपल्याला आरोग्याच्या दृष्टीने कोणत्याही आजाराला सामोरे जावे लागत नाही याचे महत्त्व योगा शिक्षिका प्रतिमा वाघ यांनी पटवून दिले. योगाविषयी सर्व माहिती प्राप्त केल्यानंतर मा. आयुक्त यांच्या समवेत सर्व विभागप्रमुख/अधिकारी, कर्मचारी व स्थानिक नागरिक यांनी एक तास योगसाधनेचा आस्वाद घेतला. फक्त योग दिनाचे औचित्य साधून नव्हे तर आपल्या या धकाधकीच्या आयुष्यात दररोज किमान एक तास आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच शहरातील नागरिकांनी योगसाधना आत्मसात करण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात आले.